N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** भंडारा **P.S.(ठाणे):** भंडारा

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 2125 **Year (वर्ष):** 2026

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**13/10/2026 19:39

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबधक अधिनियम, १९८८ | 7A |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** मंगलवार

**Time Period (कालावधी):** पहर 4

**Date From (दिनांक पासून):** 13/10/2026

**Date To ( दिनांक पर्यंत):** 13/10/2026

**Time From (वेळेपासून):** 11:28 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 12:00 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 13/10/2026 **Time (वेळ):** 19:05 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 053

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 13/10/2026 19:05 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पूर्व, 2 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** जिल्हा आरोग्य प्रषिक्षण कं◌ेद्

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with OKEN Scanner

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** नितेश कुमाबराव देशमुख

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1985

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, भंडा,भंडारा,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, भंडा,भंडारा,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-7588244268

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | संजिव ग्यानीराम नैतामे | | | 1. सामान्य रूग्णालय परीसर भंडारा,,भंडारा,भंडारा,महाराष्ट्र, भारत |
| 2 | प्रविण माधव बडवाईक | | | 1. सामान्य रूग्णालय परीसर भंडारा,,भंडारा,भंडारा,महाराष्ट्र, भारत |

. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**



Scanned with OKEN Scanner

Scanned with OKEN Scanner

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक सामान | मोबाईल फोन | आलोरो श्री. प्रविण बडवाईक याचा ओप्पो कंपणीचा अन्ड्राईड मोबाईल | 15,000.00 |
| 2 | इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक सामान | मोबाईल फोन | आलोरो श्री. संजिव नेतामे याचा सामसंग कंपणीचा अन्ड्राईड मोबाईल | 10,000.00 |
| 3 | इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक सामान | मेमोरी कार्ड/फ्लॅश मेमोरी कार्ड | एक सनडीस्क कंपणीची 32 ळठ मेमरी कार्ड. | 0.00 |
| 4 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | लाच रक्कम. | 15,000.00 |
| 5 | इतर | कच्चा माल | आलोसे श्री. प्रविण बडवाईक याचा एक फिक्कट काळया रंगाचा जिन्सपट | 0.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

40,000.00

11.***Inquest Report / U.D. case No., if any***
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

मी श्री. नितेष कुषाबराव देषमुख, वय 41 वर्ष, व्यवसाय- नोकरी, पद-पोलीस निरीक्षक, नेमणुक- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, भंडारा, मो. नं. 7588244268 सरकार तर्फे फिर्यादी होवून लेखी फिर्याद देतो की, मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, भंडारा येथे माहे जून-2025 पासून पोलीस निरीक्षक पदावर नेमणुकीस आहे. दिनांक 12/10/2026 रोजी आम्ही लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, भंडारा येथे हजर असतांना मा. पोलीस उपअधीक्षक, श्री. प्रविणकुमार पाटील सर यांनी आम्हाला त्यांचे कक्षात बोलावून तक्रारदार श्री. अजित दिवाकर मार्कडेवार, वय 55 वर्शे, रा. म्हाडा काॅलोनी, खात रोड, भंडारा, व्यवसाय- नौकरी यांची ओळख करून दिली व त्यांची लाच मागणी संबंधाने तक्रार असल्याचे सांगून त्यांची तक्रार ऐकुण घेवून पुढील कार्यवाही करण्याबाबत आदेषित केले होते. त्यावरून आम्ही तक्रारदार यांना त्यांचे तक्रारीबाबत तोंडी विचारपूस करून त्यांना त्यांची तक्रार लिहूण देण्याकरीता पेन व कोरे कागद उपलब्ध करून दिले असता, त्यांनी त्यांची लेखी तक्रार लिहून दिली. ती येणे प्रमाणे.

''लेखी तक्रारः- भंडारा दिनांक: 12/10/2026 प्रति, मा. पोलीस उपअधिक्षक साहेब, अॅन्टी करप्षन ब्युरो, भंडारा, विशयः- गैरअर्जदार यांनी लाच मागणी केल्याने त्यांचेवर कार्यवाही होणेबाबत. अर्जदार:- श्री. अजित दिवाकर मार्कडेवार, वय 55 वर्शे, रा. डप्ळ.35, म्हाडा काॅलोनी, खात रोड, भंडारा, ता.$जि. भंडारा, व्यवसाय- नौकरी, मो.क्र. 8329678277. गैरअर्जदारः- 1) डाॅ. संजिव नैतामे, वैद्यकीय अधिकारी, जिल्हा प्रषिक्षण केंद्र, आरोग्य विभाग, जिल्हा परीशद भंडारा, कार्यालय पत्ता- सामान्य रूग्णालय परीसर, भंडारा. 2) श्री. प्रविण बडवाईक, आरोग्य सहाय्यक, जिल्हा प्रषिक्षण केंद्र, आरोग्य विभाग, जिल्हा परीशद भंडारा, कार्यालय पत्ता- सामान्य रूग्णालय परीसर, भंडारा महोदय, मी समक्ष लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, भंडारा येथे आज दिनांक 12/10/2026 रोजी हजर येवून लेखी तक्रार नोंदवितो कि, मी सन 1996 ला प्राथमिक आरोग्य केंद्र सानगडी, ता. साकोली, जि. भंडारा येथे आरोग्य सेवक पदावर नौकरीवर रूजु झालो आहे. त्यानंतर मी विविध ठिकाणी नौकरी केली आहे. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, भंडारा यांचे दिनांक 25/03/2021 रोजीच्या आदेषान्वये माझी प्राथमिक आरोग्य केंद्र खांबा, ता. साकोली, जि. भंडारा येथून आरोग्य विभाग, जिल्हा परीशद भंडारा येथे बदली झाली होती. तेव्हा पासून मी आरोग्य विभाग, जिल्हा परीशद भंडारा येथे कार्यरत असता, मा. जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परीशद भंडारा यांचे दिनांक 11/07/2022 रोजीच्या आदेषान्वये माझी बदली जिल्हा प्रषिक्षण



Scanned with OKEN Scanner

केंद्र, सामान्य रूग्णालय भंडारा परीसर येथे झाल्याने मला त्याच दिवशी कार्यमुक्त करण्यात आले होते. तेव्हा पासून मी जिल्हा प्रषिक्षण केंद, सामान्य रूग्णालय भंडारा परीसर येथे आरोग्य सहाय्यक पदावर कार्यरत आहे. माझे वरीश्ठ अधिकारी डाॅ. संजिव नैतामे, वैद्यकीय अधिकारी हे असून माझेच कार्यालयात श्री. प्रविण बडवाईक, आरोग्य सहाय्यक पदावर कार्यरत आहेत. मा. जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परीशद भंडारा यांचे दिनांक 29/09/2026 रोजीच्या आदेषान्वये मला आरोग्य विभाग, जिल्हा परीशद भंडारा येथील साथरोग विभागाचा पदभार स्विकारण्याबाबत लेखी आदेषित करण्यात आले होते. त्याच दिवशी डाॅ. संजिव नैतामे, वैद्यकीय अधिकारी, जिल्हा प्रषिक्षण केंद्र यांनी साथरोग विभाग येथे मला कार्यमुक्त करण्यात आले असल्याचे पत्र माझे मोबाईलचे व्हाट्अपवर पाठविले होते. परंतु कार्यमुक्त करण्यात आल्याचे आदेष मला प्रत्यक्ष देण्यात आले नव्हते. तसेच माझी साथरोग विभागात काम करण्याची ईच्छा नसल्याने आदेष रद्द होणेकरीता मी दिनांक 06/10/2026 रोजी मा. जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परीशद भंडारा डाॅ. नितीन कापसे साहेब यांना भेटण्यास त्यांचे कार्यालयात गेलो व त्यांना माझे आदेष रद्द करण्याची विनंती केली असता, ते मला रागात तुझे अधिकारी डाॅ. नैतामे असून तुमच तुम्ही बघून घ्या. माझ्याकडे यायचे नाही. असे बोलून रागावले होते. मी अद्याप पर्यत जिल्हा प्रषिक्षण केंद्र येथेच कार्यरत आहे. दिनांक 08/10/2026 रोजी मी जिल्हा प्रषिक्षण केंद्र येथे कर्तव्यावर हजर असता, गैरअर्जदार श्री. प्रविण बडवाईक, आरोग्य सहाय्यक हे मला बोलले की, ‘तुला जिल्हा प्रषिक्षण केंद्र येथेच ड्युटी करायची असेल आणि तुझे साथरोग विभाग येथे काम करण्याचे आदेष रद्द करायचे असेल तर मी डाॅ. संजिव नैतामे, वैद्यकीय अधिकारी यांचे सोबत बोलून तुझे आदेष रद्द करून देतो. असे बोलून डाॅ. संजिव नैतामे यांचे करीता एकुण 25,000/- रूपये लाचेची मागणी करून प्रथम 15,000/- रूपये व आदेष रद्द झाल्यानंतर 10,000/- रूपये मागणी केली आहे. आज दिनांक 12/10/2026 रोजी मी सकाळी 10.00 वा. सुमारास जिल्हा परीशद भंडारा येथे हजेरी पटावर स्वाक्षरी करण्याकरीता गेलो असता, मला तिथे श्री. प्रविण बडवाईक, आरोग्य सहाय्यक हे मिळून आले. तेव्हा त्यांनी मला, माझ्या साथरोग विभागाच्या आदेषाबाबत डाॅ. संजिव नैतामे यांचे सोबत बोलणी केली आहे. त्याकरीता त्यांनी होकार दर्षविला आहे. असे बोलून लाच रक्कमेची व्यवस्था झाली का? याबाबत विचारणा केली. तेव्हा मी, त्यांना पैसे जमले कि सांगतो. असे बोललो होतो. तरी, गैरअर्जदार 1) डाॅ. संजिव नैतामे, वैद्यकीय अधिकारी, जिल्हा प्रषिक्षण केंद्र, आरोग्य विभाग, जिल्हा परीशद भंडारा व गैरअर्जदार 2) श्री. प्रविण बडवाईक, आरोग्य सहाय्यक, जिल्हा प्रषिक्षण केंद्र, आरोग्य विभाग, जिल्हा परीशद भंडारा यांनी माझी जिल्हा प्रषिक्षण केंद्र, आरोग्य विभाग, भंडारा येथून साथरोग विभाग येथे झालेली बदली आदेष रद्द करून देण्याकरीता मला एकुण 25,000/- रूपये (पंचविस हजार रूपये) लाचेची मागणी केली व पहीला ट्प्पा 15,000/- रूपये मागीतले आहे. ती लाच रक्कम मला त्यांना देण्याची मुळीच ईच्छा नाही. गैरअर्जदार यांचेशी माझे पुर्वीचे कोणतेही आर्थिक देवाण घेवाणीचे व्यवहार किंवा वैमनस्य नाही. करीता आज दिनांक 12/10/2026 रोजी हजर येवून गैरअर्जदार यांचे विरुध्द कायदेशीर कार्यवाही होणेस तक्रार देत आहे. सहपत्रः- 1) मा. जिल्हा आरोग्य अधिकारी यांचे दिनांक 29/09/26 चे आदेष झेराॅक्स प्रत. 2) मा. वैद्यकीय अधि. जि.प्र.प. भंडारा यांचे दि. 29/09/26 चे कार्यमुक्त आदेष झेराॅक्स प्रत. 3) मा. जिल्हा आरोग्य अधिकारी यांचे दिनांक 11/07/22 चे नियुक्ती आदेष झेराॅक्स प्रत. 4) आधार कार्ड झेराॅक्स प्रत सही इंग्रजित अस्पश्ट’’

अशी लेखी तक्रार दिली होती. त्यावरुन आम्ही गैरअर्जदार यांचे विरुध्द सापळा आजमाविण्याचा निर्णय घेतला. या कार्यालयाचे जा.क्र. 969/2026, दि. 12/10/2026 प्रमाणे मा. विभाग नियंत्रक, राज्य परीवहण, भंडारा यांना दोन पंच मिळणे करीता पत्र दिले असता त्यांनी 1) श्री. रविंद्र लालाजी धुर्वे, वय 35 वर्शे, पद-लिपीक, 2) श्री. चंद्रषेखर मेघषाम मांढरे, वय 40 वर्शे, पद- लिपीक, दोन्ही नेमणुक- राज्य परीवहण, भंडारा यांना पुरविले. दोन्ही पंच प्रत्यक्ष हजर झाल्यानंतर आमचे सुचनेवरून तक्रारदार यांनी दोन्ही पंचासमक्ष त्यांची तक्रार तोंडी कथन केली. त्यानंतर तक्रारदार यांनी दिलेली लेखी तक्रार दोन्ही पंचाना वाचण्यास दिली. त्यावेळी ती त्यांनी वाचून पाहिली असता, तक्रारदार यांनी तोंडी कथन केलेली व लेखी तक्रार एकच असल्याची खात्री झाल्याने लेखी तक्रार व कार्यवाही संबंधाने सादर केलेल्या कागदपत्रावर आम्ही व दोन्ही पंचानी सहया केल्या आहेत. त्यानंतर गैरअर्जदार यांनी मागणी केले्ल्या लाच रक्कमे पैकी पहीला हप्ता त्यांना देता यावा. याकरीता आम्ही तक्रारदार यांना पैसे सादर करण्याबाबत बोललो असता, त्यांनी सोबत आणलेले 15,000/- रुपये रक्कम (ज्यात 500/- रूपये दराच्या 30 भारतीय चलनी नोटा) पंचासमक्ष सादर केले. त्यानंतर नोटांचे क्रमांक लॅपटॉपवर टाईप करुन त्यांची प्रिंट काढली. दोन्ही पंच यांचे कडुन नोटावरील नंबर व टाईप केलेले नंबर पडताळणी करुन तक्रारदार आणि दोन्ही पंच यांना नोटांवर लावण्यात येणारे अॅन्थ्रासिन पावडर व अल्ट्रावायलेट टार्च संबंधाने सविस्तर माहिती देवून नोटांवर अॅन्थ्रासिन पावडर लावून अल्ट्रावायलेट टार्चचा प्रकाष टाकुन प्रात्यक्षीक करण्यात आले व ते नोटा लिफाफ्यात ठेवून लिफाफा सापळा बॅग मध्ये सुरक्षीत ठेवण्यात आला.



Scanned with OKEN Scanner
Scanned with OKEN Scanner

त्यानंतर आम्ही तक्रारदार श्री. अजित मार्कडेवार यांना गैरअर्जदार 1) डाॅ. संजिव नैतामे, वैद्यकीय अधिकारी, जिल्हा प्रषिक्षण केंद्र, आरोग्य विभाग, जिल्हा परीशद भंडारा व गैरअर्जदार 2) श्री. प्रविण बडवाईक, आरोग्य सहाय्यक, जिल्हा प्रषिक्षण केंद्र, आरोग्य विभाग, जिल्हा परीशद भंडारा हे आपल्याला कधी व कुठे भेटतील? या बाबत विचारणा केली असता, तक्रारदार यांनी सांगितले कि, दोन्ही गैरअर्जदार हे जिल्हा प्रषिक्षण केंद्र, सामान्य रूग्णालय परीसर भंडारा येथे भेटू षकतात. ज्यावेळी मी त्यांचेकडे माझ्या कामासंबंधाने जाईन त्यावेळी गैरअर्जदार हे मला पैष्याची मागणी करण्याची षक्यता असून पुढील पडताळणी कार्यवाही आजच करावी. अषी विनंती केली. पडताळणी कार्यवाही करीता तक्रारदार आणि पंच क्रमांक 1 यांना गैरअर्जदार यांचे कार्यालय जिल्हा प्रषिक्षण केंद्र, सामान्य रूग्णालय परीसर भंडारा येथे व्हाॅईस रेकाॅर्डर पंच क्रमांक 1 यांचे आवाजात रेकाॅर्डींग मोडवर सुरु करुन पाठविण्याचे ठरविण्यात आले.
त्यानंतर तक्रारदार आणि दोन्ही पंचांना पडताळणी कार्यवाही संबंधाने सविस्तर माहिती देवून त्यात वापरण्यात येणारे व्हाॅईस रेकाॅर्डर आणि मेमरी कार्डचा वापर कषा प्रकारे करण्यात येतो. याबाबत सांगून कार्यालतील सोनी कंपनीचे व्हाॅईस रेकाॅर्डर दाखविले. नवीन 32ळठ ँदक्पो डपबतव ैक्म्ब् बंतक काढुन मेमरी कार्ड वरील क्रमांक पंचाकडुन खात्री करुन व्हाॅईस रेकाॅर्डर मध्ये सेल टाकुन डेट आणि टाईम सेट करुन मेमरी कार्ड व्हाॅईस रेकाॅर्डर मध्ये टाकण्यात आले. व्हाॅईस रेकाॅर्डर पंच क्र. 1 श्री. रविंद्र धुर्वे यांचे आवाजात रेकाॅर्डींग मोडवर वेळ 17ः49 वाजता सुरु करुन ते तक्रारदार यांचे गळयात घालुन तक्रारदार आणि पंच क्रमांक 1 यांना गैरअर्जदार यांना भेटण्याकरीता तक्रारदार यांचे मोपेड गाडीने 17ः51 वाजता रवाना केले होते. वेळ 18ः34 वाजता तक्रारदार व पंच क्रमांक 1 हे ला.प्र.वि. कार्यालयात परत आले. आम्ही तक्रारदार श्री. अजित मार्कडेवार यांचे गळ्यातुन व्हाईस रेकाॅर्डर बाहेर काढुन पंच क्रमांक 1 यांचे आवाजात 18.36 वा. बंद केला. व्हाईस रेकाॅर्डर मध्ये असलेल्या मेमरी कार्ड मधील थ्व्स्क्म्त्.1 मध्ये फाईल क्रमांक 261012ऋ1747 ही फाईल रेकाॅर्ड झाली असल्याची दिसुन आली. त्यानंतर आम्ही पंच क्रमांक 01 श्री. रविंद्र धुर्वे यांचे कडुन पडताळणी कार्यवाही दरम्यान घडलेली हकिकत कथन करण्यास सांगितले, त्यांनी हकिकत कथन केल्यानंतर लाच मागणी पडताळणी कार्यवाही दरम्यान व्हाईस रेकार्ड मध्ये रेकार्ड झालेले संभाशण दोन्ही पंचासमक्ष एैकले असता, पंच क्र. 1 यांनी सांगितलेली हकिकत व तक्रारदार यांनी दिलेल्या दुजोÚया वरून व रेकार्डर मधील संभाशणावरून ''तक्रारदार हे गैरअर्जदार यांना भेटण्यास जिल्हा प्रषिक्षण केंद्र, सामान्य रूग्णालय परीसर भंडारा येथे भेटण्यास गेले होते. तेव्हा त्यांना कार्यालयात गैरअर्जदार श्री. प्रविण बडवाईक, आरोग्य सहाय्यक हे मिळून आल्याने, तक्रारदार यांनी गैरअर्जदार श्री. बडवाईक यांना ''तु बोलजो ना, तर हो, तु पहीले तूच स्वतः बोलषील ना, त्या रद्द गिद्दच्या वगैरे, आणि मी पण तो बोलिनच'' त्यावर गैरअर्जदार श्री. बडवाईक हे तक्रारदार यांना ''हो सर, कापसे सरांना बोलले आहेत, तर सांगितलं पंचविस मध्ये बरोबर आहे'' त्यावर तक्रारदार ''पंचविस हजार'' असे बोलले असता, गैरअर्जदार श्री. बडवाईक ''हो, म्हणजे जू जसा चाललाय तसाच चालू दे, नंतर तू दे त्यांनले, नाय त साहेबांसोबत बोल तसा, साहेब पैसे माझे रेडी आहेत, काय करायचं म्हणून'' त्यावर तक्रारदार ''पंधरा हजार रूपये मी आता देतो आणि तो अर्ज ज्या दिवषी रद्द होईल, त्या दिवषी मी दहा हजार रूपये देतो'' त्यावर गैरअर्जदार श्री. बडवाईक यांनी ''हो, सरांना दे, तरच करत

13. **Action taken:** ***Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.*** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** **(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

ULHAS PADMAKAR BHUSARI(I (Inspector)) / DGPUPBMM7801 **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव)**:**

**Rank (पद):** **No.(क्र.):**

***to take up the Investigation*** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or (किंवा)**

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**:**

Scanned with OKEN Scanner
Scanned with OKEN Scanner

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**Registered by** (नोंदणी अधिकारी)

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): ULHAS PADMAKAR E
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): DGPUPBMM7801

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

ठाणे अंमलदार
पोलीस स्टेशन

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):
दि.14/10/2026 व 10.30 वा.



Scanned with OKEN Scanner
Scanned with OKEN Scanner